॥महामंत्र॥ ॥महामंत्र॥ 'मी आहे' ॥महामंत्र॥ ॥महामंत्र॥



'मी आहे'

श्री निसर्गदत्त महाराजांचा महामंत्र

॥महामंत्र॥ ॥महामंत्र॥ 'मी आहे' ॥महामंत्र॥ ॥महामंत्र॥

'मी आहे'

श्री निसर्गदत्त महाराजांचा महामंत्र

प्रकाशक :
सतिश आव्हाड
सी/११,विश्वजित सोसायटी,
वीर सावरकर मार्ग,नौपाडा,ठाणे (प.१)
दुरध्वनी : ०२२-२५३६०२२३,२५४४८७८७

प्रथम आवृत्ती : दि.१७ मार्च २०१७

संकलन-संपादक
सचिन क्षीरसागर,पुणे
९८९०७११९८०
श्री.प्रदिप आपटे
e-mail: apte98@gmail.com

मुद्रक-सजावट
भरत शिंपी
धन्यवाद क्रिएशन,जळगांव/पुणे
९९७०१८२९१७
e-mail : bharatshimpi.917@gmail.com

मनोगत

श्री निसर्गदत्त महाराजांचा महामंत्र हा संग्रह सर्व साधक भक्तांच्या हाती देताना आम्हांला खूप आनंद होत आहे. श्री निसर्गदत्त महाराजांच्या सर्व वाङ्मयातून 'मी आहे' या महामंत्राची निवड सुरवातीस श्री महाराजांचे एक भक्त श्री प्रदिप आपटे यांनी केली व त्यानंतर श्री भरत शिंपी यांनी त्यात भर घालून त्याला एक वेधक सादरीकरण देऊन हा दुर्मिळ संग्रह तयार झाला आहे.

येथे महामंत्र असे म्हणताना त्याचा जप करायचा आहे हे अभिप्रेत नसून, 'मी आहे' याच्या नि:शब्द बोधात राहणे हे अभिप्रेत आहे. माणसाने खगोलातील लाखो कोटी मैलावरील ग्रह तारे शोधण्यासाठी सूक्ष्म सूक्ष्म दुर्बिणी शोधल्या आहेत, पण स्वत:चा शोध घेण्यासाठी तो काहीही करीत नाही. माणूस सर्वांच्या सहवासात राहतो, आईच्या, मूलांच्या, मित्रांच्या, नातेवाईकांच्या सहवासात राहतो, पण माणूस स्वत:च्या सहवासात कधीही राहत नाही. माणूस सर्व जग पाहतो, प्रेक्षणीय स्थळे पाहतो, विविध गोष्टी पाहतो पण स्वत: कडे कधीही समाधान होई पर्यंत पहात नाही. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीला आपल्याला सर्व जण ओळखतात याचा खूप अभिमान असू शकतो पण तो स्वत:ला ओळखत नाही याचे त्याला काहीही वाटत नाही.

श्री निसर्गदत्त महाराजांनी स्वत:ला ओळखण्या करता या महामंत्र संग्रहा मध्ये खुप सोपी पद्धत, साधना सांगीतली आहे. 'मी आहे' याची ओळख, 'मी आहे' यात राहण्याची साधना आणि 'मी आहे' यात स्थिर झाल्यानंतर होणारा परिणाम श्री निसर्गदत्त महाराजांच्या विशिष्ट शैलीत आपल्याला या संग्रहात आढळेल.

कोणालाही सकाळी जाग आल्यानंतर लक्षात येते की 'मी आहे'. जाग आल्यानंतर व्यवहार सुरु होण्या आधी, 'मी आहे' हे लक्षात आल्याची जी नि:शब्द जाग आहे ती आहे देव ते आहे ज्ञान. पण ते ज्ञान नंतर व्यवहारात लिप्त झाल्यामुळे व्यक्ती त्या देवाला विसरतो.

'मी आहे' यात स्थिर होण्यासाठी 'मी आहे' ला 'मी आहे' नेच धरण्याची साधना श्री महाराज येथे सांगतात. ही साधना करायची म्हणजे नेमके काय करायचे? तर 'मी आहे' या भावात स्थिर व्हायचे. इतके स्थिर व्हायचे की, 'मी आहे' याची गरज देखील संपली पाहिजे.

'मी आहे' यात स्थिर झाल्यावर, स्थिर झालेल्याकडून कोणतीही चूक होणार नाही अशी एक खात्री येथे श्री महाराज देतात. त्याचा एक अर्थ असा ही घेता येईल की जोपर्यंत साधका कडून काही चूका होत आहेत, त्याला अजून काही प्रश्न वा शंका पडत आहेत म्हणजे तो अजून 'मी आहे' या भावात पक्का स्थिर झालेला नाही.

साधकाला स्वत:कडे जाण्यासाठी वेग-वेगळी साधन प्रक्रिया हवी असते. पण श्री महाराज 'मी आहे' यात बोधाच्या अंगाने स्थिर होणे एवढाच अष्टांग योग आणि एवढीच भक्ती येथे सांगत आहेत. श्री महाराजांनी यात सांगीतलेल्या ज्ञानाद्वारे प्रत्येकाला स्वत:ला ओळखण्यास तसेच स्थिर होण्यास निश्चीतच मदत होईल असे वाटते.

सचिन क्षीरसागर

३१ डिसेंबर २००८ ला सकाळच्या वेळी एका तास भराच्या सुमारास श्री निसर्गदत्त महाराजांच्या 'मी आहे' ह्या महामंत्रावर इंग्रजीत काही ओळी लिहल्या होत्या नंतर ऑक्टोबर २०११मध्ये त्याची प्रस्तुती सॅन होसे,अमेरीका येथे 'सायन्स अॅंड नॉन डुअॅलिटी ' ह्या कॉन्फरन्स मध्ये दिली होती.

ह्याच ओळ्यांना श्री.सचिन क्षीरसागर आणि श्री.भरत शिंपी ह्यांनी माझ्या पेक्षा जास्त विस्तृत आणि सुंदर रूप दिले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व त्यांना आशिर्वाद.

श्री.प्रदिप आपटे

मी आहे

एवढेच खरे बाकी सर्व अनुमान.

'मीआहे'

ही जाणीव धरून ठेवणे म्हणजे
शांती,आनंद आणि प्रेमाची स्थिती.



यात स्थिर होणे हेच सर्व
पापातून तुम्हाला मुक्त करेन.

मी आहे

हे सदासर्वदा ताजे असते,
असण्यासाठी आठवावे लागत नाही.

मी आहे

या जाणिवेच्या चिंतनाला
तुम्ही हृदय-मन लावा.

मी आहे

जो
'मी आहे'
यात स्थिर होतो
तो सदा मुक्त आहे.

मी आहे

यात माझे अस्तीत्व आहे प्रत्येक रूप माझे आहे, मी आहे आणि मी असल्यामुळे सर्व काही आहे.

मी आहे

याला 'मी आहे' नेच धरायचे.

मी आहे

ह्यात स्थिर झाल्यावर कोणताही भाव भेदभाव उरत नाही,
सगळा भेदभाव हा 'मी आहे' ह्याच्या नंतर उद्भवतो.


मी आहे
ही अंतिम वस्तुस्थिती आहे.

मी आहे

या एकाच गोष्टीची तुम्हांला खात्री असू शकते.
त्यात स्थिर व्हा आणि बाकी सर्व सोडा.हाच योगमार्ग.

मी आहे

या जाणीवेची एकदा खात्री झाली,
निश्चित झाले की मग 'मी आहे'
या स्मृतीची गरज संपते.

॥ मी आहे ॥

हा सर्व अनुभवांचा पाया आहे.

‘मीआहे’

या खेरीज इतर विचारांना थारा देऊ नका,
मग आणखी काही करण्याची जरूरी नाही.
सर्व काही उत्स्फूर्तपणे, नैसर्गिकपणे,
तुमच्या हस्तक्षेपाशिवाय घडत जाईल.

मंदिर

ह्यात स्थिर नेहमी करता स्थिर झाल्यावर
‘मी आहे’ हा भाव देखील लुप्त होऊन जातो.



या मुळेच तुम्ही

‘मी सत्यस्वरूप आहे’

असे म्हणू शकता.

‘मी आहे’

अनुभव घेणारे आपण ‘मी आहे’ अशी जाणीव,
हा सुध्दा अनुभवच आहे.



मी सर्व आहे,
हे जाताच ‘मी आहे’ असे येते.
‘मी आहे’ हे जाताच केवळ सद्वस्तु
असते आणि तिच्यामध्ये प्रत्येक
‘मी आहे’ हे राखले जाते.



हे असण्यासाठी जगाची गरज नाही,
पण जगाला 'मी आहे' ची गरज असते.

॥ मी आहे ॥

हेच केवळ सत्य आहे,
हे सत्यच जाणण्याची तुम्हाला गरज आहे.

मी आहे

हा भाव लुप्त होणारच,
कारण सगळीकडे हाच अद्वैत भाव उरतो.

मी आहे

असे म्हणणे बरोबर आहे.पण मी अमुक आहे,तमुक आहे असे म्हणणे
शोध न घेण्याचे,तपासुन न पाहण्याचे लक्षण आहे.
मानसिक दुर्बलपणाचे किंवा सुस्तीचे लक्षण आहे.

‘मीआहे’

या जाणीवेवर मन केंद्रीत करा.

‘मी आहे’ ही जाणीव शुध्द आणि साधे अस्तित्व आहे.

जेव्हा ***मी आहे***

‘मी आहे’

**असे मी म्हणतो,
तेव्हा मी सदावर्तमान वस्तुस्थितीचे
वारंवार केवळ,प्रतिपादन करतो.**

मी आहे

हे पिशवी सारखे असते किंवा ज्या धाग्याने पिशवी विणली आहे तो धागा म्हणजे 'मी आहे'.

मी आहे

असा विचार हाच जगरूपी आरसा
साफ करण्याचा फडका आहे.
त्याने आरसा स्वच्छ करीत रहा.

माझ्या आवडी पेक्षा मी

मी आहे...

यात जास्त राहतो.

मी नेहमी

'मीआहे'

ह्या भावताच असतो.

मी आहे

ह्या जाणिवेत दृढतेने स्थिर रहा,
हाच सर्व प्रयत्नांचा आरंभ आणि शेवट आहे.

मी आहे

ह्यात जो स्थिर झाला त्याला कोणत्याही प्रकारच्या शंका आणि प्रश्न उरत नाही.

मी आहे

या जाणीवेतही शुध्द प्रकाश आणि अस्तित्वाची संवेदना यांचा समावेश असतो. ‘आहे’ हे नसताना देखील ‘मी’ असतो.

मी आहे

असा साधा भाव सर्वांत उत्तम.

मी आहे

हाच माझा धर्म,हाच अर्थ,
हेच काम आणि हाच मोक्ष.

मी आहे

म्हणजे, निःशब्द,
निराकार,
शुध्द जाणीव.

मीआहे

हीच माझी समाधी.

मी आहे

हेच
मी पहातोय!

मी आहे

म्हणजे फक्त 'मी आहे',
शुध्द असणे, या व्यतिरिक्त काहिच नाही!

मी आहे...

हाच माझा अष्टांग योग.

जो

‘मीआहे’

यात स्थिर होतो तो चुकीचे
काहीच करू शकणार नाही.

हा देह नसुन

फक्त

‘मी आहे’

मी आहे

ह्यात राहण्याची साधना,
हा भाव,
नेहमी करता लुप्त होईपर्यंत केली पाहिजे.

मी आहे

फक्त हेच
मला माहित आहे.

मी आहे

फक्त ह्या भावाला घट्ट धरून रहा
तोच तुमचा देव, गुरू,
आणि मार्गदर्शक



ह्यात स्थिर होणे
हिच खरी साधना.

श्रम हेच माझे प्रारब्ध.

मी आहे

हिच माझी ओळख,
ह्यात व्यक्ती हा उरतच नाही.

मी आहे

ह्यात स्थिर होणे म्हणजेच
तुर्यावस्था आणि हेच
तुमचे खरे स्वरूप.

मीआहे

हेच माझे ज्ञान,
आणि हिच माझी भक्ती



स्वतःकडे स्थिरपणे पहा.
ते पुरेसे आहे.बंदिस्त दरवाजाच
तुम्हाला मुक्त करणारा आहे.
'मी आहे' हा दरवाजा.

मी आहे,

‘मी आहे’

हे स्पदंन माझ्या
अंतरी सतत चालले आहे.

‘मी आहे’

हेच माझे श्रवण, मनन,
आणि हाच माझा निदिध्यास

आई

हेच मला सगळीकडे दिसते,भासते
आणि फक्त हेच माझ्या मनात असते.

मी नेहमी **सोऽहं** ह्या भावातच असतो म्हणून
कोणत्याही ईच्छा अपेक्षा उरतच नाही.

मी आहे

हे काय आहे, कसे आहे,
त्याचा उगम,जीवन,अर्थ
काय आहे, असे चिंतन करा.

‘मी आहे’

ही जाणीव तुमची स्वतःची आहे.
तुम्ही तिच्यापासून वेगळे होऊ शकत नाही.

मीआहे

या जाणीवेत पुढे काही नाही
ती कालातीत अवस्था आहे.



‘मी आहे’

ही अगदी सरळ,
सोपी आणि अमोल संपदा
श्री निसर्गदत्त महाराजांनी जगाला दिली
त्या करीता जग त्यांना
कधीच विसरणार नाही.